# श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय,यवतमाळ.

जा.क्र. शावैमवरूय/चिकित्सालयीन भांडार/ 8024 /2023 दि. 02/ 06/2023

02-06-2023

## औषधवैद्यक शास्त्र विभागा अंतर्गत डायलिसीस करिता आवश्यक असलेल्या चिकित्सालयीन बाबी खरेदी करण्या करिता

**(महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत)**

## अल्पावधी जाहिर ई–दरपत्रक सुचना

श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, यवतमाळ या संस्थेतील औषधवैद्यकशास्त्र विभागा अंतर्गत डायलिसीस युनिट मध्ये येणा–या रुग्णांचे **महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत** डायलिसीस करण्याकरिता लागणा–या आवश्यक चिकित्सालयीन साहित्य खरेदी करिता सहा महिणे कालावधी करिता दर निश्चित करुन ठेवण्या करिता इच्छूक पुरवठादारांकडुन व्दि लिफाफा पध्दतीने दरपत्रक मागविण्यात येत आहेत. अल्पमुदतीचा थेट पुरवठा करणा–या पुरवठादारा कडुनच केवळ जाहिरात मधील नमुद अटीनुसार प्राप्त होणा–या मोहोरबंद दरपत्रके सादर करण्याची अंतीम तारीख दि. 12-6-2023 दुपारी 4 वाजेपर्यंत असुन दिनांक 13.6..2023 रोजी सकाळी 11 वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात दरपत्रके उघडण्यात येईल इच्छुक पुरवठादारास सदर सभेस उपस्थित राहता येईल.

**दरपत्रक सादर करतांना इच्छुक पुरवठादारांनी खालील अटी व शर्ती नुसार दरपत्रक सादर करावे.**

**1) तांत्रीक लिफाफा :–** या लिफाफ्यामध्ये पुरवठादाराने **दुकान नोंदणी प्रमाणपत्र, जिएसटी प्रमाणपत्र, अन्न व औषधी प्रशासन विभागाचा परवाना, पॅनकार्ड व अधिकृत विकेता प्रमाणपत्र** या प्रमाण पत्राच्या छायांकित प्रती टाकुन तो मोहोरबंद करण्यात यावा त्यावर स्पष्ट शव्दात **तांत्रीक बाबीचा लिफाफा** असे नमुद करुन स्वतःचे नांव व पत्ता लिहावा. तो मोहोरबंद करावा.

**2) किंमतीचा लिफाफा :–ज्यामध्ये दर नमुद असलेला कागद स्वाक्षरी व शिक्यानिशी टाकण्यात यावा** व त्यावर स्पष्ट अक्षरात **किंमतीचा लिफाफा** असे नमुद करुन स्वत':चे नांव ,पत्ता लिहावा व तो देखील मोहोरबंद करण्यात यावा.

3) **उपरोक्त दोनही लिफाफे एका मोठया लिफाफ्या मध्ये टाकुन दरपत्रक हे अधिष्ठाता श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय,यवतमाळ** यांच्या नावे सादर करावयाचे असुन **दरपत्रकाच्या लिफाफ्यावर औषधवैद्यकशास्त्र विभागा करिता आवश्यक असलेल्या चिकित्सालयीन बाबी खरेदी करण्या करिता दरपत्रक** असे स्पष्ट नमुद करण्यात यावे. स्वतःचे नांव व पत्ता लिहावा. **तांत्रीक लिफाफ्या मध्ये दराचा उल्लेख करु नये त्यामध्ये दर आढळल्यास दरपत्रक अग्राहय समजन्यात येईल.**

.4) विहित नमुन्यातच पुरवठादारास मागविण्यात आलेल्या साहित्याच्या किंमतीचे दर नमुद असलेले विवरण पत्रात सादर करण्यात यावे. दर हे हाताने लिहिण्यात येवु नये टंकलिखीत करूनच सादर करण्यात यावे. **संस्थेने सुचीत केलेल्या वरिलप्रमाणे तारखे नंतर प्राप्त होणारी दरपत्रके स्विकारण्यात येणार नाही.**

5) पुरवठादाराने त्यांचे दर त्यांचे लेटरहेडवर संस्थेने दिलेल्या नमुन्यातच दिलेल्या क्रमाने देण्यात यावे.

6) जिथे दर दयावयाचे नाही तिथे इच्छुक नाही असे स्पष्ट नमुद करावे ती जागा रिकामी सोडण्यात येउ नये

7) सर्व दर हे एक नगा करिता सर्व कर व चार्जेस समाविष्ट करून नमुद करावे

8) आदेश प्राप्त होताच आदेशातील साहित्याचा पुरवठा तातडीने करणे बंधन कारक राहील.

9) न्युनतम दर असणा–या पुरवठादाराकडुन आदेश देण्यापुर्वी नमुना मागविण्याचा अधिकार खरेदी समितीस राहील व नमुना मान्य झाल्यावरच पुरवठा आदेश देण्यात येईल नमुना योग्य दर्जाचा न आढळल्यास त्यांचे दर रदद करण्यात येईल.

10)पुरवठादाराने सादर केलेले दर संचालनालय दरकरार,बिएमसी दरकरार,अेम्स दरकरार,डिजीएसॲन्डडी दरकरार,इएसआयएस दरकरार व मे.हाफकिन जीव औषध महामंडळ, मुंबई यांचे दरकरारापेक्षा पुरवठादाराचे दर जास्त आढळल्यास पुरवठादाराचे दर अग्राहय समजण्यात येईल.

अपुर्ण माहितीसह प्राप्त होणारी दरपत्रके नाकारण्याचा अधिकार मा.अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे. संपुर्ण दरपत्रकाची प्रकिया रदद करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे. तसेच दरनिश्चिती झाल्यावर आवश्यकतेनुसार वेळोवेळी आदेश काढण्यात येईल. सदर ची खरेदी ही रूग्णांकरिता अत्यावश्यक व तातडीचे असल्याने संबंधीत पुरवठादार पुरवठा करण्यास सक्षम असणे आवश्यक आहे. अन्यथा आदेश प्राप्त होताच सदर साहित्याचा पुरवठा दहा दिवसाच्या आत करून न दिल्यास त्यांचेवर शासन नियमाप्रमाणे योग्यती कार्यवाही करून सदरचे आदेश रदद करण्यात येईल. त्याकरिता आपले कोणतेही गा–हाणे या संस्थेस मान्य राहणार नाही. अन्यथा आपले आदेश रदद करून व्दितीय पुरवठादारास आदेश देण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

अधिष्ठाता,
श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकिय महाविद्यालय
व रूग्णालय, यवतमाळ

जा.क्र. शावैमवरूय/सर्जिकल भांडार/ 4025/2023 दि. 2/ 6/2023

श्री.वसंतराव नाईक शासकीस वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ
चिकित्सालयीन भांडार
(महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत)
**दरपत्रका करिता चिकित्सालयीन साहित्याची यादी**

| Sr.No. | Name of Item | Specification |
|---|---|---|
| 1 | Dialyzer | F-6 1.3 Meter sq. |
| 2 | Blood Line Set | Post pump |
| 3 | A.V. Fistula Needle | No.17G (Pair) |

अधिष्ठाता
श्री. व. ना. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
व रुग्णालय, यवतमाळ